लोकमत पृ. पान क्र. १


रस्ता खोदला : रेल्वेच्या सरकत्या जिन्याचे काम रखडले

# भाईंदरच्या रेल्वे प्रवाशांची कोंडी कधी सुटणार?

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरारोड :** भाईंदर रेल्वे स्थानकाच्या पश्चिमेस बालाजीनगर येथील रेल्वे पादचारी पुलाची पूर्वीची दिशा बदलल्याने नवीन पूल उपयोगात येत नाही. त्यामुळे प्रवाशांना अरुंद बोळातून प्रवास करावा लागत आहे. यावर उतारा म्हणून रेल्वे प्रशासनाने सरकत्या जिन्याचे काम हाती घेतले आहे. मात्र पालिकेने रस्ता खोदून ठेवल्याने सरकत्या जिन्याचे काम रखडले आहे.

रेल्वे स्थानकात पश्चिमेकडून ये-जा करायची असल्यास विरार दिशेकडील मुख्य प्रवेशद्वार, चर्चगेट दिशेकडील बालाजीनगर - विनायक मंदिर येथून रस्ता आहे. पोलिस चौकीसमोरून पादचारी पूल होता, परंतु तो पाडून रेल्वे प्रशासनाने नवीन पूल बांधला.



## काही तासांचे काम काही महिन्यांवर

सरकत्या जिन्याची फ्रेम तयार असून क्रेनच्या साहाय्याने ती आणून बसवावी लागणार आहे. हे काही तासांचे काम आहे. मात्र खोदून ठेवलेला रस्त्यामुळे ते करता येत नाही. रस्ता पूर्ण होण्यासाठी आणखी काही महिने लागणार असल्याने जिन्याचे कामसुद्धा आणखी काही महिने लांबणीवर जाणार आहे.

## आयुक्तांशी चर्चा

बालाजीनगर येथील प्रवाशांची होणारी गैरसोय दूर व्हावी म्हणून तेथे सरकत्या जिन्याचे काम सुरु केले गेले आहे. बालाजीनगर येथील रस्त्याचे काम सुरु असल्याने सरकत्या जिन्याची फ्रेम, आदी सामान आणण्यासाठी तात्पुरत्या स्वरूपात रस्ता करून देण्याबाबत महापालिका आयुक्त यांच्याशी चर्चा केली आहे.

- राजन विचारे, खासदार, ठाणे

## जिन्याची फ्रेम, अन्य साहित्य आणण्यात अडचणी

उतरण्याची व चढण्याची दिशा ही मधल्या रेल्वे पुलाच्या दिशेने केली. त्यामुळे तो प्रवाशांना अडचणीचा ठरत आहे. नवीन पुलाच्या कामामुळे रेल्वे समांतर असलेली गल्ली अरुंद झाली. या बोळातून प्रवाशांना प्रवास करावा लागत आहे. पर्याय म्हणून रेल्वेने सरकत्या जिन्याचे काम हाती घेतले. तोडलेल्या पुलाच्या ठिकाणी आता सरकता जिना बसवला जाणार आहे. यामुळे प्रवाशांना दिलासा मिळणार आहे. सरकत्या जिन्यासाठी काँक्रीटचा पाया उभारला, परंतु बालाजीनगर येथील रस्त्याचे काम सुरू असल्याने जिन्याचे साहित्य आणता येत नाही.

# सदनिका देतो सांगून फसवणूक

**नालासोपारा :** के. टी. व्हिलेज येथील न्यू सूर्या अपार्टमेंटमध्ये राहणाऱ्या ऋषी उपाध्याय (३०) यांची १५ ऑगस्ट ते ११ सप्टेंबरदरम्यान सदनिकेच्या नावावर लाखोंची फसवणूक केली आहे. आरोपी ऋषी पांडे, सौरभ मिश्रा आणि राजन या तिघांनी त्यांचा विश्वास संपादन करून सदनिका विकत घेऊन देतो, असे त्यांना सांगितले. त्यांच्या बँक खात्यावरून वेळोवेळी १० लाख २८ हजार रुपये आरोपींनी स्वतःच्या बँक खात्यात घेऊन सदनिका न देता व घेतलेले पैसेही परत न करता फसवणूक केली आहे. माणिकपूर पोलिसांनी शनिवारी गुन्हा दाखल केला आहे.



# पाण्यात पडून तरुणाचा मृत्यू

**नालासोपारा :** पोमण शिलोत्तर येथे राहणारे लैला ऊर्फ अजित शेख (३०) यांचा पाण्यात पडून बुडून मृत्यू झाला आहे. गुरुवारी ते चिंचोटी सर्व्हे नंबर ३६ येथील खदानीवर अंघोळ करण्यास गेले होते. त्यावेळी तोल जाऊन पाण्यात पडून नाकातोंडात पाणी जाऊन त्यांचा मृत्यू झाला आहे. नायगाव पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

# तरुणाने घेतला गळफास



**नालासोपारा :** नायगावच्या मरियम नगर येथील शांती सागर सोसायटीत राहणाऱ्या अक्षय चव्हाण (२८) या तरुणाने आत्महत्या केली आहे. त्याने गुरुवारी नैराश्येतून राहत्या घराच्या हॉलमध्ये असलेल्या छताच्या लोखंडी हुकाला नायलॉन दोरीच्या साहाय्याने गळफास घेतला आहे. माणिकपूर पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

CamScanner

लोकमत पु. पान क्र. १



मुंबई - अहमदाबाद महामार्गाच्या नूतनीकरणाचे काम सुरु असून ओल्या असलेल्या काँक्रिटीकरणाच्या रस्त्यावरून वाहने धावत आहेत.

# महामार्ग काँक्रिटीकरणाचे काम गेले लांबणीवर?

## पावसाळ्यात प्रचंड वाहतूककोंडीची भीती

लोकमत न्यूज नेटवर्क

**पारोळ :** मुंबई - अहमदाबाद महामार्गाच्या काँक्रिटीकरणाचे काम सध्या लांबणीवर पडले आहे. त्यामुळे पावसाळ्यात चालकांना वाहतूक कोंडीला सामोरे जावे लागणार आहे.

महामार्गाच्या नूतनीकरणाचे काम सुरू आहे. जो ठेकेदार हे काम करत आहे, त्याला नियोजनबद्धरीत्या काम करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी गोविंद बोडके तसेच पालघर जिल्हा पोलिस व मीरा - भाईंदर, वसई - विरार पोलिस आयुक्तालयाने दिल्या होत्या. असे असताना सरळसोट मार्गाने वेगाने महामार्ग नूतनीकरणाचे काम सुरू आहे. त्यामुळे ओल्या असलेल्या काँक्रिटीकरणाच्या रस्त्यावरून वाहने धावत आहेत. त्यामुळे महामार्गावर वाहनांच्या चाकाचे ठसे उमटले आहेत.

सध्या पावसाळा नजीक असल्याने हे काम पावसाळ्यात लांबणीवर पडून वाहतुकीचा खोळंबा वाढणार आहे; तर वाहतूकदार आणि नागरिकांना प्रचंड वाहतूककोंडीचा सामना करावा लागणार आहे.

लोकमत पु. पान क्र. ३

# दागिने परत देतो सांगून महिलेला ८ लाखांचा गंडा

## आचोळे पोलिसांनी केला गुन्हा दाखल

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** एव्हरशाइन सिटीतील नेमिनाथ टॉवर येथे राहणाऱ्या सुनंदा कुकडाल (६४) यांची २० नोव्हेंबर २०२० ते आजपर्यंत लाखोंची फसवणूक झाली आहे.

अंजू रेड्डी (५९) आणि सुरेश रेड्डी (६४) यांनी सुनंदा यांचा विश्वास संपादन करून ३ लाख ७० हजार रुपये रोख व मुलगी नैना शेट्टी हिच्या खात्यामार्फत २ लाख ५० हजार रुपये असे एकूण ६ लाख २० हजार रुपये घेतले. त्यानंतर सुनंदा यांच्या मालकीचे ८ लाख ६१ हजार ९१४ रुपये किमतीचे २३३.०८ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने लग्नासाठी वापरून परत देते असे सांगून विश्वासाने




त्यांच्याकडून घेऊन ते परत न करता अपहार करत फसवणूक केली आहे.

तसेच अंजू रेड्डी व तिचा पती सुरेश रेड्डी यांनी यापूर्वी एव्हरशाइन परिसरातील प्रकाश नारायण शाचिया व दमयंती सतीश राणा यांच्याकडूनही पैसे घेऊन त्यांचीही फसवणूक केली आहे. आचोळे पोलिसांनी शनिवारी गुन्हा दाखल केला आहे.

CS CamScanner

लोकमत पु. पान. क्र. ०४

# अनधिकृत होर्डिंग लावणे महागात

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : मुंबई-अहमदाबाद महामार्गावर काशीगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत परवानगी नसताना बेकायदा लावलेल्या भाजपच्या निवडणूक जाहिरातीच्या होर्डिंग-प्रकरणी सहा दिवसांनी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

भाजपच्या होर्डिंगवर पंतप्रधानांच्या फोटोसह 'मोदी की गॅरंटी'ची जाहिरात करण्यात आली होती. त्यावर पुन्हा एकदा एनडीएला बहुमताने निवडून आणा, असे आवाहन करत भाजप, शिंदेसेना व अजित पवार गट यांच्या पक्षांची चिन्हे होती. याप्रकरणी निवडणूक आयोगाच्या सी व्हिजिलन्स ॲपवर तक्रार केल्यानंतर पालिकेच्या पथकाने १६ एप्रिल रोजी कारवाई करत होर्डिंगवरील निवडणूक प्रचाराचा बॅनर काढून टाकला होता, परंतु गुन्हा दाखल केला नसल्याच्या तक्रारी सुरू होत्या.

अखेर आचारसंहिता फ्लाइंग स्क्वाड पथकाचे कनिष्ठ अभियंता वैभव कुलथे यांच्या फिर्यादीवरून काशीगाव पोलिस ठाण्यात होर्डिंग ठेकेदाराविरोधात २१ एप्रिल रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

लोकमत पान क्र. ०२

# आ. गीता जैन यांच्या समर्थक महिलेला धमकी

**लोकमत न्यूज नेटवर्क**

**मीरा रोड :** भाजप समर्थक आ. गीता जैन यांच्या नारी सशक्तीकरण फाउंडेशनचे काम करणारी व त्यांची समर्थक असलेल्या एका महिलेचा मोबाइल एक ॲप डाउनलोडच्या बहाण्याने घेतला आणि त्यातील महिलेचे खासगी फोटो घेत नंतर ते कुरिअरने घरी पाठविण्यात आले. त्यात धमकीची चिठ्ठी असल्याच्या तक्रारीवरून नवघर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. आ. जैन यांच्या समर्थक रिया म्हात्रे यांना जैन यांच्या कार्यालयात निवडणूक मतदार यादीबद्दलचे ॲप डाउनलोड करून घेण्यासाठी १८ मार्चला बोलावण्यात आले होते. म्हात्रे यांचा मोबाइल भाजप कार्यकर्ते राजन नायर व जैन यांच्या कार्यालयातील दर्शील शर्मा यांनी घेतला होता. एक ॲप त्यांनी डाउनलोड केले. १३ एप्रिलला म्हात्रे यांना आझाद खान (साईबाबानगर, बोरिवली) नावाच्या व्यक्तीकडून कुरिअर आले. त्यात त्यांच्या मोबाइलमधील काही फोटो व चिठ्ठी होती.



CamScanner

पुढारी पू पान क्र. ०१

## आर्थिक फसवणूक

पालघर : आचोळे पोलीस ठाणे हद्दीमधील पूजा बिल्डिंग मधील सुमन खान यांची त्याच्या पतीने वीस लाख रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार समोर आला आहे. सुमन यांनी आपल्या पतीला मोबाईल मधील व्यवहार करणाऱ्या काही पचा पासवर्ड दिले होते. एका मोबाईल सेंटरच्या मालकाच्या मदतीने सुमनचा पती मिठारुल खान याने सुमन यांना न सांगता १९ लाख ८३ हजार रुपये परस्पर काढून घेतले. नोव्हेंबर-डिसेंबरचा हा प्रकार आहे हे पैसे मागितले असता ते देण्यास नकार दिला व सुमन यांना जीवे ठार मारण्याची धमकी दिली. त्यामुळे सुमन यांनी आचोळे पोलिसात तक्रार दिल्यानंतर गुरुवारी या प्रकरण गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## बापाचे दुष्कृत्य

पालघर : मुलीच्या मैत्रिणी सोबत बापाने अत्याचार केल्याची घटना तुळींज पोलीस ठाणे क्षेत्रात घडली आहे. मुलीच्या मैत्रिणीला घरी बोलावून घरी कोणी नसल्याचा फायदा घेत बापाने हा अत्याचार केला आहे. शनिवारी सकाळी मुलीच्या वडिलांनी तिच्या मैत्रिणीला काही सामान देण्यासाठी घरी बोलावले होते. घरी वडील एकटेच होते. त्यांनी या मुलीला जबरदस्तीने मद्य पाजले. तिला त्रास होऊ लागल्यानंतर तिला घरात आराम करण्यास सांगितले. यावेळी जबरदस्तीने तिच्यासोबत दुष्कर्म केल्याची तक्रार या मुलीने पोलीस ठाण्यात दिल्यानंतर नराधम बापा विरोधात पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

## एक जखमी

पालघर : नालासोपारा पश्चिमेकडी नाळे गावात जीर्णावस्थेच्या दुमजली इमारतीचा स्लॅब कोसळल्याने मदनसिंग नामक एक तरुण जखमी झाल्याची घटना घडली आहे. ही घटना घडल्यानंतर महापालिका व अग्निशामनदल घटनास्थळी पोचून दोन कुटुंबांना या इमारतीतून सुरक्षित रित्या बाहेर काढले आहे. शनिवारी रात्री नऊ वाजेच्या दरम्यान खंबाळेश्वर येथे या इमारतीच्या गॅलरीचा स्लॅब कोसळला. महापालिकेने या धोकादायक इमारती मधून कुटुंबांना बाहेर काढत सुरक्षेच्या कारणास्तव ही धोकादायक इमारत जमीन दोस्त केली आहे.

## मेफेड्रोन जप्त

पालघर: नालासोपारा पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये मलिक हुसेन या व्यक्तीकडून पोलिसांनी मेफेड्रीन जप्त केला आहे. शुक्रवारी संध्याकाळी नालासोपारा पोलिसांनी ही कारवाई केली असून या व्यक्तीकडून आठ लाख ८० हजार रुपयांचे हे ड्रग्ज जप्त केले आहे. हुसेन याने हे विक्रीसाठी स्वतः जवळ हा पदार्थ बाळगला होता असे समजते. शनिवारी या प्रकरणी नालासोपारा पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

## चालक ताब्यात

पालघर : भरधाव वेगाने ठोकर मारून एका पदचाऱ्याच्या मृत्यूस कारणीभूत ठरलेल्या ट्रक चालकाला पोलिसांनी वलसाड येथून अटक केली आहे. १६ एप्रिल रोजी अपघात घडल्यानंतर ट्रक चालक सुरजीत सिंह हा फरार झाला होता. पेल्हार पोलिसांनी सीसीटीव्ही चित्रीकरणाच्या सहाय्याने शोध घेऊन तो वलसाड येथे असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. गुजरात वलसाड येथून या ट्रकचालकाला ताब्यात घेतले आहे. हिट अँड रण प्रकरणी पेल्हार पोलिसात हा गुन्हा दाखल होता.

CamScanner

मटा पु.पान.०१

# लग्नाचे आमिष दाखवून तरुणीवर अत्याचार

म. टा. वृत्तसेवा, मिरा-भाईंदर

लग्नाचे अमिष दाखवून एका तरुणीवर लैंगिक अत्याचार करण्यात आल्याची घटना मिरारोडमध्ये घडली आहे. महिला नोकरी करत असलेल्या ठिकाणी उच्चपदावर काम करणाऱ्या व्यक्तीने हे कृत्य केले आहे. या प्रकरणी काशिगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पीडित ३२ वर्षीय तरुणी एका खासगी कंपनीत कामाला आहे. येथे तिची वरिष्ठ पदावर काम करणाऱ्या राघवेंद्र सुगंधी याच्या सोबत ओळख झाली. यावेळी राघवेंद्रने पीडित तरुणीला तिच्याशी लग्न करण्याचे आश्वासन दिले. त्यानंतर तिच्यावर तिच्या इच्छेविरोधात अनेक महिने लैंगिक अत्याचार केले.

मटा पु.पान क्र.०२

# उच्चशिक्षित तरुणाची स्वतःच्या घरातच चोरी

मिरा-भाईंदर : एका उच्चशिक्षित तरुणाने स्वतःच्या घरातील लाखो रुपये किमतीचे दागिने लंपास करून त्यांची मैत्रिणीच्या मदतीने विक्री केल्याचा प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी उच्चशिक्षित तरुणासह त्याच्या मैत्रिणीविरोधात नवघर पोलिस ठाण्यात नुकताच गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

भाईंदरच्या गोल्डन नेस्ट परिसरात आकाश (बदललेले नाव) हा त्याच्या दोन भावांसह आई-वडिलांसोबत राहतो. तो वकिलीचा व्यवसाय करतो. मध्यंतरी त्याच्या आईला बांगड्या, कानातले व इतर असे एक लाख रुपयांहून अधिक किमतीचे दागिने मधल्या काळात घरातील तिजोरीत सापडले नाहीत. त्यामुळे त्याच्या वडिलांनी दागिन्यांचा शोध घेण्यास सुरुवात केली. यादरम्यान त्यांच्या वडिलांना आकाशने घरातील दागिन्यांची चोरी करून मैत्रिणीच्या मदतीने त्याची विक्री केल्याचे समजले. याची तक्रार आकाशच्या वडिलांनी नवघर पोलिस ठाण्यात दाखल केली होती. त्यावरून नवघर पोलिसांनी दोघांवरही रविवारी चोरीचा गुन्हा दाखल केला आहे.

CamScanner
CamScanner

लोकसत्ता पु. पान क्र. ०४

# वसईत दुकलीकडून सोन्याचा हार लंपास

## चोरीसाठी दुकानात सेल्सगर्लची नोकरी

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई :** सिनेमात लोकांना फसवून गंडा घालणारी 'बंटी-बबली' नावाची जोडगोळी चर्चेत आली होती. वसईतही अशाच एका दुकलीने एका प्रख्यात ज्वेलर्सच्या दुकानात चोरी केली आहे. यातील तरुणीने चोरी करण्यासाठी दुकानात आधी सेल्सगर्लची नोकरी मिळवली आणि नंतर तिचा मित्र ग्राहक बनून दुकानात आला आणि पावणेदोन लाखांचा सोन्याचा हार लंपास केला. ही जोडी सध्या फरार असून पोलीस त्यांचा शोध घेत आहेत.

या बंटी बबलीचे नाव आहे अमृता सकपाळ आणि विनोद मर्चंडे. ज्वेलर्स दुकानात कडेकोट बंदोबस्त असतो. त्यामुळे तेथे चोरी करणे कठीण असते. यासाठी अमृता सकपाळ हीने नायगाव येथील तनिष्क या दुकानात सेल्सगर्लची नोकरी मिळवली. या दुकानात एकूण ५३ जणांचा स्टाफ आहे. अमृताने दोन महिन्यांत सर्व कामाची पध्दत, बारकावे हेरून ठेवले. ठरलेल्या योजनेनुसार तिचा मित्र विनोद मर्चंडे दुकानात ग्राहक बनून आला. त्याने आपल्या गळ्यातील सोनसाखळी दाखवून अशीच चेन हवी असे सांगितले. त्यानुसार अमृता त्याला दुकानातील वेगवेगळ्या सोनसाखळी दाखवू लागली. दरम्यान, विनोदने आपल्या गळ्यातील नकली सोनसाखळी काढून सोन्याची खरी सोनसाखळी गळ्यात घातली.

### ...अशी झाली चोरी उघड

अमृता आणि विनोदची योजना यशस्वी झाली होती. कुणाला संशय येणार नाही असे त्यांना वाटले. मात्र काही दिवसांनी दुकानात आलेल्या एका ग्राहकाने एक सोनसाखळी पसंद केली होती. ती ग्राहकाला देण्यापूर्वी तपासणीमध्ये त्यावर हॉलमार्क नसल्याचे आढळले. तपासणीत ती नकली असल्याचे समजले आणि एकच खळबळ उडाली. नकली सोनसाखळी दुकानात आलीच कशी, असा प्रश्न पडला आणि धावपळ सुरू झाली. अखेर सीसीटीव्हीमध्ये ११ एप्रिल २०२४ रोजी हा प्रकार दिसून आला. मात्र तो पर्यंत अमृताही काम सोडून पसार झाली होती. या प्रकरणी तनिष्क ज्वेलर्सचे व्यवस्थापक नितीन मौर्य यांनी माणिकपूर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

# वृद्धेने सराफाला गंडवले

**वसई :** नायगावच्या एका सराफाच्या दुकानातून वृध्देने हातचलाखी करून ७५ हजारांचे दागिने लंपास केले आहेत. नायगाव पोलीस या महिलेचा शोध घेत आहेत.

नायगाव पूर्वेच्या यशवंत नगर येथे गंगेश जैन यांचे अरिहंत ज्वेलर्स नावाचे दुकान आहे. काही दिवसांपूर्वी त्यांच्या दुकानात ७० वर्षांची एक वृध्दा दागिने बघण्यासाठी आली होती. ती बराच वेळ दुकानात दागिने बघत होती. यावेळी हातचलाखीने तिने दोन सोन्याच्या अंगठ्या लंपास केल्या. काही वेळाने दागिने पसंद नसल्याचे सांगून ती निघून गेली. दरम्यान ७५ हजारांच्या दोन अंगठ्या नसल्याचे जैन यांच्या लक्षात आले. त्यांनी नायगाव पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

CamScanner

लोकसत्ता ५ पान क्र. ०१

# वाहतूक विभागाकडून टँकर तपासणी मोहीम

## अपघात दुर्घटनेनंतर टँकरच्या बेदरकारपणाला आवर

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**वसई :** टँकर चालकांचा बेदरकारपणा व निष्काळजीपणामुळे झालेल्या अपघातात वीस दिवसात वसई विरार मध्ये तीन जणांचा मृत्यू झाला आहे. या दुर्घटनेनंतर आता टँकरच्या बेदरकारपणाला आवर घालण्यासाठी पुन्हा एकदा विरार वाहतूक पोलिसांनी कारवाईची मोहीम तीव्र केली आहे. पहिल्याच दिवशी ८ टँकरवर कारवाई करण्यात आली आहे.

वसई, विरार शहरात टँकर चालक हे वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करून वाहने चालवितात. त्यामुळे अधूनमधून टँकर अपघाताच्या घटना समोर येत आहे.

### मदतनीस नसल्याने अपघात दुर्घटना

टँकरचालकाच्या सोबत क्लीनर असणे आवश्यक आहे. क्लीनरमुळे मागे वळण घेताना आजूबाजूला कोणी आहे किंवा नाही. याशिवाय गर्दीच्या मार्गातून प्रवेश करताना कोणी टँकरजवळ आहे किंवा नाही याची माहिती चालकाला मिळण्यास मदत होते. मात्र वसई, विरारमधील अनेक चालक विनाक्लीनर टँकर चालवत आहेत. त्यामुळे अपघात घडत आहेत. ज्या अपघाताच्या घटना घडल्या आहेत. त्यात क्लीनर नसल्याचे निष्पन्न झाल्याचे पोलिसांनी सांगितले आहे.

### परिवहन विभागही कारवाई करणार

वाढत्या टँकर अपघाताच्या घटना लक्षात घेता आता वसई उपप्रादेशिक परिवहन विभागाकडून ही कारवाईची मोहीम हाती घेतली जाणार आहे. याबाबत टँकरचालक व मालक यांच्या बैठका याशिवाय जे टँकर रस्त्यावर धावत आहेत त्यांची तपासणी करून कारवाई केली जाणार आहे. जे कालबाह्य टँकर आहेत ते सुद्धा जप्त करण्यात येतील असे उपप्रादेशिक परिवहन अधिकारी दशरथ वाघुले यांनी सांगितले आहे.

याआधी अपघात रोखण्यासाठी वाहतूक पोलिसांनी टँकर चालक मालक यांच्या बैठका घेतल्या होत्या तर वारंवार सूचना ही केल्या होत्या. मात्र अवघे काही दिवस नियमांचे पालन होते. मात्र त्यानंतर पुन्हा नियम धाब्यावर बसवून टँकर चालकांचा बेदरकारपणा सुरूच आहे. सद्यस्थितीत उन्हाळा असल्याने वसई विरार भागात टँकरची मागणी प्रचंड प्रमाणात वाढली आहे. त्यामुळे नादुरुस्त, कालबाह्य, जुनाट अशी टँकरही रस्त्यावर धावू लागली आहेत.

२ एप्रिलला विरारच्या जकात नाका येथे दुचाकीवरून जाणाऱ्या दाम्पत्याला टँकरने चिरडले यात महिलेचा जागीच मृत्यू झाला होता. त्यानंतर १९ एप्रिलला विरारच्या ग्लोबल सिटी मध्ये टँकर मागे वळण घेताना आजी आणि **(पान ३ वर)**

# वाहतूक विभागाकडून टँकर तपासणी मोहीम

**(पान १ वरून)** नातू या दोघांचा मृत्यू झाल्याची घटना घडली. वीस दिवसातच ३ जणांचा टँकर अपघातात मृत्यू झाल्याने या प्रकाराला रोखण्यासाठी वाहतूक पोलिसांनी

टँकर तपासणी मोहीम सुरू केली जाणार आहे. ज्या भागात टँकरद्वारे पाण्याची वाहतूक अधिक होत आहे अशा ठिकाणी टँकर थांबवून टँकरचे फिटनेस प्रमाणपत्र, परवाना असलेला वाहनचालक, बॅच, क्लीनर, पाणी गळती, रिफ्लेक्टर अशा सर्व बाबी तपासून घेतल्या जात आहेत.

पहिल्याच दिवशी विरार वाहतूक पोलिसांनी ८ टँकरवर कारवाई केली आहे. तर जानेवारी पासून ते



टँकरची कारवाई मोहीम अधिक तीव्र पणे सुरू करण्यात आली आहे. प्रत्येक विभागात कार्यरत असलेल्या वाहतूक पोलिसांना त्यांची तपासणी करण्याच्या सूचना केल्या आहेत. त्यानुसार ही कारवाई होत आहे.

– प्रशांत लांगी, वाहतूक पोलीस निरीक्षक परिमंडळ ३

आतापर्यंत १०५ टँकरवर कारवाई करून सुमारे १ लाख ३५ हजार इतका दंड आकारला आहे असे विरार वाहतूक पोलीस निरीक्षक प्रशांत लांगी यांनी सांगितले आहे.

याशिवाय टँकर चालक व मालक यांची बैठक घेऊन त्यांनाही सूचना करण्यात येणार आहेत असेही लांगी यांनी सांगितले आहे.

CamScanner

लोकसत्ता पू पान क्र. ०१

# विरारमध्ये फायबर कारखान्याला भीषण आग

लोकसत्ता प्रतिनिधी

**वसई:** विरार, विरार पूर्वेकडील वीर सावरकर मार्गा जवळील भागात असलेल्या फायबर कारखान्याला भीषण आग लागल्याची घटना घडली आहे. शनिवारी रात्री ११ च्या सुमारास ही घटना घडली असून या आगीत कारखान्यातील लाखोंचा माल जळून खाक झाला आहे.

विरार पूर्वेकडील गणपती मंदीर येतील इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावर फायबरपासून विविध वस्तू तयार करणारा कारखाना आहे. या कारखान्यात शनिवारी रात्री अचानकपणे आग लागली होती आगीचा भडका मोठा असल्यामुळे आगीचे आणि धुराचे लोढ बाहेर येत होते.



सर्वत्र ठिकाणी धूर पसरल्यामुळे परिसरात नागरिकांध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. याची माहिती वसई विरार महापालिकेच्या अग्निशमन दलाला मिळताच घटनास्थळी दाखल होऊन आगीवर नियंत्रण मिळविले.

या कारखान्यात देवदेवतांच्या, महापुरुषांच्या फायबर पासून बनलेल्या मुर्त्या पॅकिंग करण्याचे काम केले जाते वसई, विरार, नालासोपारा नायगांव येथील शहरातून छोट्या मोट्या मुर्त्या मागवल्या जातात आणि बाहेरील देशात पाठवले जाते मात्र सध्या लागलेल्या आगीमुळे मुर्त्या काळ्या पडल्या असून त्यामध्ये चार ते पाच लाखांचे नुकसान झाले आहे. कारखान्यात पुठ्याचे प्रमाण जास्त होते यामुळे आगीचा भडका मोठा होता. मात्र नेमकी आग कोणत्या कारणामुळे लागली याचे कारण समजू शकले नाही. याच इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावर लहान मुलांचे रुग्णालय आहे. मात्र लागलेल्या आगीचा भडका वेळीच आटोक्यात आल्याने मोठी दुर्घटना टळली आहे.

## लेखा परिक्षणाकडे पाठ

वसई विरार शहरातील बहुतांश कारखान्यांनी आपल्या कारखान्यात अग्नी सुरक्षा लेखापरीक्षण करून घेतले नसल्याची माहिती मागील महिन्यात उघड झाली होती यावर पालिकेने कोणतीच ठोस भूमिका बजावली नसल्यामुळे शहरात आगी लागण्याचे प्रमाण वाढले आहे असा आरोप सामाजिक कार्यकर्ते यांच्याकडून केला जात आहे

CamScanner

लोकसत्ता पू पान क्र. ०१

# पोलीस ठाण्यातच पोलिसाला मारहाण

**वसई :** नालासोपाऱ्यामधील तुळींज पोलीस ठाण्यातच एका तरुणाने पोलिसाला मारहाण केल्याची घटना घडली आहे तुळींज पोलिसांनी आरोपीवर गुन्हा दाखल केला आहे.

प्रवीण रानडे (३३) हे पोलीस शिपाई वसई वाहतूक शाखेत कार्यरत आहेत. सोमवारी दुपारी दीडच्या सुमारास ते नालासोपारा पूर्वेच्या उड्डाणपूलाजवळ कर्तव्यावर होते. त्यावेळी शैलैश वाघेला (३६) याने रिक्षातून रानडे यांचे मोबाइलमधून चित्रिकरण करण्यास सुरुवात केली. त्याला रानडे यांनी आक्षेप घेत कारण विचारले. मात्र वाघेला याने रानडे यांनी दमदाटी केली करत शिविगाळ केली. त्यामुळे वाघेला याला समज देण्यासाठी तुळींज पोलीस ठाण्यात आणले. यावेळी रानडे हे ठाणे अंमलदाराकडे याबाबत सांगत असताना पुन्हा वाघेला याने रानडे यांना शिविगाळ केली आणि श्रीमुखात लगावून दिली. काही कळण्याच्या आतच वाघेलाने त्यांना ठोसा लगावला. पोलीस ठाण्यात अचानक हा प्रकार घडल्याने खळबळ उडाली. पोलीस ठाण्यातील इतर पोलीस मदतीला आले आणि रानडे यांची सुटका करत आरोपीला ताब्यात घेतले. याप्रकरणी तुळींज पोलिसांनी सरकारी कामात अडथळा आणि मारहाण केल्याप्रकरणी आरोपी शैलेश वाघेला याच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

# दीड हजार किलो गोमांस जप्त

**भाईंदर :** मिरा रोडमध्ये विक्रीसाठी आलेले जवळपास दीड हजार किलो गोमांस पकडण्यात काशिगाव पोलिसांसह गोरक्षकांना यश आले आहे. यात मांसाचे नमुने तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठवण्यात आले आहेत.

निळकमल नाक्यावर गोमांस येत असल्याची माहिती बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांना मिळाली होती. शनिवारी रात्री १ च्या सुमारास एक टेम्पो त्या ठिकाणी आल्यावर कार्यकर्त्यांनी त्याला रोखले. मात्र चालकाने वाहन सोडूनच तेथून पळ काढला. पाहणी केल्यानंतर त्यात गोमांसचे तुकडे आढळून आले. त्यामुळे गोरक्षकांनी याबाबत तातडीने काशिगाव पोलिसांना माहिती देऊन घटनास्थळी बोलावून घेतले.

CamScanner

सकाळ पु पान क्र. ०१

# उत्तन परिसरामध्ये पुन्हा बिबट्याचा वावर

## कोंबडीची शिकार करताना सीसी टीव्हीत कैद; नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण

भाईंदर, ता. २२ (बातमीदार) : भाईंदरजवळील उत्तन परिसरात पुन्हा बिबट्याचा वावर सुरू झाला आहे. केशवसृष्टी परिसरातील एका घराबाहेर लावलेल्या सीसी टीव्हीत बिबट्या कैद झाला आहे. त्यामुळे परिसरात पुन्हा एकदा भीतीचे वातावरण पसरले आहे. गेल्या वर्षी मार्चमध्येही या भागात बिबट्याचा वावर होता. त्यावेळी स्थानिकाने लावलेल्या पिंजऱ्यात बिबट्या अडकला होता.

उत्तन येथील केशवसृष्टी परिसरात बिबट्याचा वावर असल्याचा संशय

> वनविभागाने परिसरात तीन ठिकाणी कॅमेरे बसवले आहेत. या कॅमेऱ्यात बिबट्याच्या हालचाली कैद झाल्यानंतर त्याचा वावर समजून येणार आहे. त्यानंतर त्याला पकडण्यासाठी पिंजरे बसविण्यात येतील, तोपर्यंत परिसरातील रहिवाशांना काय दक्षता घ्यायची, यासंदर्भात मार्गदर्शन करण्यात येणार आहे.
> - राकेश भोईर, वनक्षेत्रपाल, वन विभाग

स्थानिकांना गेल्या दहा ते बारा दिवसांपासून येत होता. त्यातच या भागात राहणारे डॉमनिक नुनीस यांच्या घराच्या मागील भागात असलेल्या कोंबड्या गायब झाल्याने त्यांचा संशय बळावला. याठिकाणी घराबाहेर त्यांनी सीसी टीव्ही बसवला आहे; परंतु तो बंद होता. त्यांनी तातडीने सीसी टीव्ही दुरुस्त करून घेतला. त्यात रविवारी (ता. २१) पहाटे साडेतीन वाजण्याच्या सुमारास बिबट्या कैद झाला. नुनीस यांच्या घराच्या मागे असलेली कोंबडी पकडून नेत असताना बिबट्या सीसी टीव्हीत दिसून आला. स्थानिकांनी त्याची माहिती वनविभागाला दिली.

दरम्यान, गेल्या वर्षीदेखील मार्चमध्ये उत्तन येथील पालखाडी, कोपरा या भागात बिबट्या वावरत होता. त्याठिकाणी त्याच्या पावलाचे ठसे दिसून आले होते व परिसरातील कुत्रे, कोंबड्या नाहीशा होत होत्या. भीतीपोटी रहिवाशाने लावलेल्या पिंजऱ्यात बिबट्या अडकला होता. त्यानंतर वनविभागाने त्याला ताब्यात घेतले. आता या भागात बिबट्याचे दर्शन झाल्याने रहिवाशांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

# अल्पवयीन मुलीशी अश्लील चाळे

भाईंदर, ता. २२ (बातमीदार) : काशी-मिरा परिसरात एका अल्पवयीन मुलीशी अश्लील चाळे केल्याप्रकरणी एकाला अटक करण्यात आली आहे.

एक सहा वर्षीय मुलगी शुक्रवारी (ता. १९) रात्री साडेनऊ वाजण्याच्या सुमारास रस्त्यावरून जात होती. त्यावेळी आरोपीने तिला त्याठिकाणी उभ्या असलेल्या टेम्पोच्या आड नेले आणि तिच्यासोबत अश्लील कृत्य केले, ही बाब मुलीने पालकांना सांगितल्यानंतर त्यांनी काशी गाव पोलिस ठाण्यात तक्रार केली. या प्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल करत संशयिताला अटक केली.

CamScanner

सकाळ पु पान.क्र ०१

# पालिका मुख्यालयातच अग्नी सुरक्षेच्या त्रुटी

## मॉक ड्रिलदरम्यान वास्तव समोर

भाईंदर, ता. २२ (बातमीदार) : मिरा-भाईंदर पालिकेच्या मुख्यालयात सोमवारी (ता. २२) दुपारी अचानक मोठ्याने सायरन वाजवत अग्निशमन विभागाच्या गाड्या दाखल झाल्या. अधिकारी व जवानांनी तातडीने इमारतीत शिरत कार्यालयातील आयुक्त, अधिकाऱ्यांसह कर्मचारी, तसेच कामानिमित्त आलेले नागरिक यांना आग लागली असल्याचे सांगत इमारत रिकामी करायला लावली. त्यामुळे मुख्यालयात एकच धावपळ उडाली व काही मिनिटातच इमारत रिकामी झाली. त्यानंतर मात्र हे मॉक ड्रिल असल्याचे स्पष्ट करण्यात आले. मात्र, यानिमित्त महापालिकेच्या मुख्यालयात अग्निसुरक्षा कार्यवाहीत अडथळे असल्याचे उघड झाले.

मुख्यालयाच्या इमारतीच्या तिसऱ्या क्रमांकाच्या प्रवेशद्वाराच्या जिन्यातच सामान ठेवण्यात आले आहे. त्यामुळे त्या ठिकाणाहून बाहेर पडण्यात कर्मचाऱ्यांना अडथळा होत होता. शिवाय पहिल्या मजल्यावरही जिन्याच्या दिशेने जाणाऱ्या मोकळ्या भागात कार्यालये आहेत. त्यामुळे कर्मचाऱ्यांना इमारतीबाहेर पडण्यास विलंब झाला. अग्निशमन दलाने सात मिनिटांत मुख्यालयाची इमारत रिकामी केली, मात्र ही इमारत चार मिनिटांत रिकामी होणे आवश्यक आहे.

### जूनमध्ये पुन्हा चाचणी

सध्या मुख्यालयातील बहुतांश कर्मचारी निवडणूक कामात व्यग्र असल्याने कार्यालयात उपस्थित नाहीत. त्यामुळे आचारसंहिता संपली की जूनमध्ये पुन्हा एकदा मॉक ड्रिल आयोजित करण्यात यावे, त्याचप्रमाणे मॉक ड्रिलमध्ये आढळलेल्या त्रुटीचा अहवाल तयार करून तो प्रशासनाला सादर करावा व त्यानुसार संबंधितांनी कार्यवाही करावी, अशा सूचना आयुक्तांनी दिल्या.



**भाईंदर :** मॉक ड्रिलदरम्यान नागरिकांना इमारतीबाहेर काढण्यात आले.

सकाळ पू पान क्र. ०५

# छायाचित्रांद्वारे महिलेची बदनामी करण्याची धमकी

भाईंदर, ता. २२ (बातमीदार) : महिलेच्या मोबाईलमधून तिची छायाचित्रे चोरून ती समाज माध्यमांवर व्हायरल करण्याची धमकी दिल्याची घटना भाईंदर येथे घडली आहे. याप्रकरणी तीन जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

एका राजकीय पक्षाशी संबंधित महिलेला एका आरोपीने आपल्या कार्यालयात बोलावून घेतले. तिच्या मोबाईलवर निवडणूक मतदार यादीचे ॲप इन्स्टॉल करायचे असल्याचे सांगून तिच्याकडून मोबाईल घेतला. यावेळी आरोपीने तिला कार्यालयाबाहेर थांबण्यास सांगितले. त्यानंतर मोबाईल परत घेतल्यानंतर या महिलेने तिचे व्हॉटस्ॲप इतर ठिकाणी लॉग इन केल्याचा संदेश आला होता. त्यानंतर काही दिवसांनी या महिलेला मुंबईच्या एका पत्त्यावरून एक पत्र आले व त्यात तिचे राजकारणात सुरू असलेले काम त्वरित थांबविण्याबाबत सांगण्यात आले होते. असे न केल्यास महिलेची छायाचित्रे मॉर्फ करून ती समाज माध्यमांवर व्हायरल करत बदनामी करण्याची धमकी देण्यात आली होती. त्यानंतर या महिलेने नवघर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. या प्रकरणाचा तपास करत पोलिसांनी मंगळवारी (ता. १६) तीन जणांवर गुन्हा दाखल केला असून या प्रकरणातील आरोपी फरारी आहेत. याप्रकणाचा नवघर पोलिस अधिक तपास करत असून पोलिसांनी आरोपींचा शोध सुरू केला आहे.

CamScanner

1997 से
KAT खबरें आज तक
not a publication of the living media india group
वर्ष: 27 अंक-304 मुंबई, मंगलवार 23 अप्रैल 2024 पृष्ठ-12 मूल्य : 2.00

# नालासोपारा में 14,16,900 रुपये का एम.डी.ड्रग्स बरामद, दो अभियुक्त गिरफ्तार

**वसईः** नालासोपारा पूर्व के अलग-अलग क्षेत्र में एंटी नारकोटिक्स सेल और तुलिंज पुलिस ने 14 लाख से अधिक एम.डी.ड्रग्स की एक बड़ी खेप बरामद कर दो अभियुक्तों को गिरफ्तार किया है।दोनो अभियुक्तों के ऊपर नालासोपारा पुलिस स्टेशन और तुलिंज पुलिस स्टेशन ने एनडीपीएस एक्ट के तहत केस दर्ज कर आगे की तहकीकात में जुटी है।मिली जानकारी के अनुसार,तुलिंज पुलिस स्टेशन ने गुप्त सूचना के आधार पर नालासोपारा पूर्व के प्रगति नगर,हाईटेंसन रोड स्थित एक 29 वर्षीय शख्स को एम.डी.ड्रग्स के साथ हिरासत में लिया। पुलिस ने बताया कि,शख्स के पास से 53.69 ग्राम वजन एमडी ड्रग्स बरामद किया गया है,जिसकी कुल कीमत 5,36,900 रुपये आकी गयीं है।पुलिस ने कहा कि,शख्स उपरोक्त ड्रग्स बिक्री हेतु करने के लिए रखा था। हालाँकि,शख्स शाबान अहमद हुसैन आलम (29) को गिरफ्तार कर लिया गया है। तुलिंज थाने के सीनियर पी.आई.शैलेंद्र नगरकर ने कहा कि, उपरोक्त




शख्स के ऊपर तुलिंज थाने में एनडीपीएस एक्ट के तहत केस दर्ज कर उसे कोर्ट में पेश किया गया,जहा कोर्ट ने उसे 25 अप्रैल तक पुलिस हिरासत में रखने का आदेश दिया है।दूसरा मामला ; एंटी नारकोटिक्स सेल की टीम ने नालासोपारा पश्चिम क्षेत्र के फनफ़िस्टा रोड स्थित एक 34 वर्षीय शख्स (मलिक मजरुद्दीन हुसैन) के पास से 44 ग्राम वजन एम.डी.ड्रग्स/मेफेड्रॉन (कीमत-8,80,000 रुपये) बरामद किया है।गिरफ्तार अभियुक्त मूल निवासी-पश्चिम बंगाल का रहने वाला है। पुलिस ने कहा कि,उक्त अपराध को अंजाम देने में उसने बजाज पल्सर मोटरसाइकिल क्रमांक एमएच.48-सीपी.5138 का उपयोग किया।शख्स ने उपरोक्त ड्रग्स बिक्री करते हुए पकड़ा गया है।फिलहाल, उपरोक्त अभियुक्त के ऊपर नालासोपारा पश्चिम पुलिस स्टेशन में एनडीपीएस एक्ट के तहत केस दर्ज किया गया है।हालाँकि, उपरोक्त कार्रवाई में पुलिस ने कुलमिलाकर 1,416,900 रुपये एमडी ड्रग्स की बरामद की गई है।

CamScanner